



दैनिक **मराठवाडा पत्र**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■






●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १९२ ●शनिवार, दि. ११ ऑक्टोबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955




# शिवाजीराव दादांनी विविध क्षेत्रात भरीव काम केले : राज्यपाल हरिभाऊ बागडे

## गेवराईत शिवाजीराव पंडित यांचा अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न





**गेवराई । प्रतिनिधी**

शिवाजीराव (दादा )पंडित यांनी शिक्षण आणि सहकार क्षेत्रासह विविध क्षेत्रात भरीव काम केले. मंत्री असताना रोजगार हमी योजना खाते त्यांनी यशस्वीपणे सांभाळत ग्रामीण भागाचा विकास केला. त्याचबरोबर ग्रामीण भागात शिक्षण संस्था उभारून आपल्या भागातील मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी त्यांनी प्रयत्न करुन घराघरात शिक्षण पोहचविले ▶ उर्वरित पान २ वर

### ● दादांनी सर्व घटकांना सोबत घेऊन काम केले : ह.भ.प. शिवाजी महाराज

यावेळी आशीर्वादपर बोलताना ह.भ.प. शिवाजी महाराज म्हणाले की, शिवाजीराव दादांनी सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन काम केले. त्यांनी भक्तीचा ध्वज उभारला. त्यांना साधुसंतांचे आशिर्वाद मिळाले, त्यामुळे त्यांचे आरोग्य आणि शिवछत्र परिवार सुखात आहे. दादांनी त्यांच्या मुलांवर चांगले संस्कार केल्यामुळे ते पुढे उत्तम आणि जनकल्याणचे काम करत आहे. नगदनारायण महाराजांचा त्यांना आशिर्वाद आहे असेही ते यावेळी बोलताना म्हणाले.

### ● शिवाजीराव दादांचे जीवन लोकसमर्पीत आहे : ह भ.प. महादेव महाराज

माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित कीर्तन महोत्सवाचा समारोप श्री क्षेत्र चाकरवाडी संस्थानचे महंत ह.भ.प. महादेव महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, शिवाजीराव पंडित यांनी समाजाला प्रगत करण्यासाठी काम केले. त्यांचे जीवन लोकसमर्पीत आहे. शिक्षण आणि सहकार क्षेत्रात काम करुन त्यांनी लोकांच्या जीवनात अर्थक्रांती आणली. अनेक परिवार सुखी झाले, त्यांना साधुसंत आणि गोरगरीब जनतेचे आशीर्वाद आहेत असेही ते यावेळी म्हणाले.

### ● शेतकऱ्यांची दिवाळी गोड होईल : अमरसिंह पंडित

यावेळी बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले, राज्यपाल बागडे साहेब यांच्या शब्दाला महाराष्ट्र शासनाकडे मोठी किंमत आहे, त्यामुळे विनंती करतो की, नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाने मोठी मदत केली, भरघोस पॅकेज दिले आहे, पण आपल्या प्रमुख कापुस या पिकाला बागायतीचा दर्जा दिला नाही. तो मिळाला तर आपल्या शेतकऱ्यांची दिवाळी गोड होईल. मराठवाड्यात सर्वाधिक क्षेत्रावर कापसाचे उत्पादन घेतले जाते, त्यामुळे या बाबत पुढाकार घेण्याचे आवाहन अमरसिंह पंडित यांनी राज्यपाल हरिभाऊ बागडे यांना केले.

### ● दादांचा वारसा यशस्वीपणे पुढे चालवणार: आ. विजयसिंह पंडित

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, दादांनी उपेक्षीत घटकाच्या विकासासाठी, दिन दलीत आणि सामान्य माणसांसाठी काम केले तोच वारसा घेऊन आम्ही काम करत आहोत. गेवराई विधानसभा मतदारसंघातील जनतेने मला भरभरुन आशिर्वाद दिल्यामुळे मी विधिमंडळात दहा महिन्यांत चांगले काम करु शकलो. यापुढेही अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली विकासकामे करण्यासाठी कमी पडणार नाही असेही ते यावेळी म्हणाले.

# पंकजा मुंडेंच्या वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याची विक्री ?

## सहकार क्षेत्रात मोठी खळबळ; नेमकं काय घडलं?

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील परळी तालुक्यातील पांगरी येथील वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना विक्रीच्या चर्चांमुळे सध्या सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. दिवंगत लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी स्थापन केलेल्या या प्रतिष्ठित सहकारी साखर कारखान्याची विक्री झाली असल्याचा गंभीर




आरोप कायदाविषयक सल्लागार परमेश्वर गीते यांनी केला आहे. परमेश्वर गीते हे काही काळ या कारखान्याशी कायदेशीर सल्लागार म्हणून कार्यरत होते. त्यांनी सदर विक्री थांबवावी, अशी मागणी करत बीडचे जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज देखील सादर केला आहे. भाजप नेत्या आणि मंत्री पंकजा ▶ उर्वरित पान २ वर

# कपिलधारवाडी व हिंगणी खुर्द पुनर्वसनाबाबत जिल्हास्तरीय बैठक संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

मौजे कपिलधारवाडी व मौजे हिंगणी खुर्द (ता. बीड) या गावांच्या पुनर्वसनासंदर्भात आज दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे मा. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण जिल्हास्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत पुनर्वसन प्रक्रियेतील आवश्यक टप्प्यांविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी महोदयांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना



नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देऊन पुनर्वसनाचे काम नियोजनबद्ध व तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, अप्पर जिल्हधिकारी हरिष धार्मिक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा संगीता पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक संजय राऊत, जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख शिंदे, कार्यकारी अभियंता तोंडे, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार बीड चंद्रकांत शेळके, ▶ उर्वरित पान २ वर

# जिल्हा परिषद आरक्षण सोडत 13 ऑक्टोबर रोजी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व त्या अतर्गत पंचायत समित्यांच्या सर्वत्रिक निवडणूका २०२५ आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर झाला असून मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांनी दिलेल्या सूचनेनुसार दिनांक १३.१०.२०२५ वार सोमवार रोजी पंचायत समितीच्या अनुसुचित जाती अनुसुचित जाती महिला, अनुसुचित जमाती अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागास प्रवर्ग नागरिकांचा ▶ उर्वरित पान २ वर

# दिवाळीनंतर निवडणुकीचा फटाका फुटणार

## पहिल्या टप्प्यात जिल्हापरिषद, पंचायत समिती तर दुसऱ्या टप्प्यात नगरपरिषदेच्या निवडणुका ?

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांची जोरदार तयारी सुरू झाली असून, जिल्हापरिषद, पंचायत समिती, नगरपरिषदेचे आरक्षण जाहीर





झाले. तर महानगरपालिका आरक्षण जाहीर होणार आहे. ही तयारी पाहता निवडणुकांचा बिगूल दिवाळीच्या नंतर वाजणार असे चिन्ह असून, तशी संभाव्य तारीख ▶ उर्वरित पान २ वर

# शेतकरी कर्जमाफीसाठी राजेश्रीताई राठोड यांचे सात दिवसा पासुन आमरण उपोषण सुरु

## राजश्रीताई राठोड यांच्या उपोषणाला शेतकरी राजा सामाजिक समितीचा पाठिंबा



**बीड । प्रतिनिधी**

राज्यात पावसाने सर्वत्र हा प्रकार घातल्याने राज्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. गावागावात पुराच्या थेमानाने शेतकऱ्यांची पीक त्यांची घरी जनावरे मरण पावल्याने शेतकऱ्यांचे आतूनच नुकसान झाले आहे. जगाचा पोशिंदा शेतकरी आज संकटात सापडल्याने सरकार शेतकऱ्यांना पाहिजे तशी मदत देत नाही. सरकारने केलेल्या अल्पशा मदतीच्या घोषणेने शेतकऱ्यांचे झालेले प्रचंड नुकसान भरून निघणार नाही. यामुळे शेतकऱ्यांच्या हितासाठी एक रागिनी राजेश्रीताई राठोड पुढे आल्या आहेत. त्यांनी निस्वार्थ आणि नितळ मनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी मागणी आहे. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी, मराठवाड्यात 'ओला दुष्काळ' जाहीर करून प्रति हेक्टर रुपये ▶ उर्वरित पान २ वर

# 'तुझं कॅरेक्टर खराब करून टाकील'

## पवनचक्कीसाठी पोलिसाची शेतकऱ्याला दाबदडप !

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यावाल्यांसाठी पोलीस प्रशासनाने अक्षरशः... पायघड्या घातल्याचे दिसून येत आहे. शेतकऱ्यांना आपल्या शेतात पवनचक्कीसाठी जागा दिली परंतु त्याचा त्याचा मोबदला मिळत



नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. पवनचक्की वाल्यापुढे पोलीस शेतकऱ्यांचं म्हणनं सुद्धा ऐकू येईनासे झाले आहे. बीड तालुक्यातील चौसाळा परिसरातील कानडीघाट येथे पवनचक्कीसाठी पोलीस ▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्ह्यात अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी पंचनामे सुरू – व्हायरल झालेली गावांची यादी अधिकृत नसल्याचे प्रशासनाचे स्पष्टीकरण

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांचे शेतीपिक नुकसानीचे संयुक्त पंचनामे करण्याची कार्यवाही तालुका स्तरावर सुरू असून पंचनामे पूर्ण झाल्यानंतर शासनास निधी मागणी जिल्हा प्रशासनाच्या वतीने तात्काळ करण्यात येईल, याची आवश्यक खबरदारी प्रशासनाकडून घेण्यात येत आहे.

दरम्यान, समाजमाध्यमांवर बीड जिल्ह्यातील माहे सप्टेंबर, २०२५ मधील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या ३०४ गावांची यादी व्हायरल होत असल्याचे ▶ उर्वरित पान २ वर



# बीड नगर पालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने बैठकीचे आयोजन

## शहरातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आ.संदीप क्षीरसागरांनी केले आवाहन



**बीड । प्रतिनिधी**

आगामी बीड नगर परिषद निवडणूक २०२५ पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) तर्फे बीड शहरातील कार्यकर्ता आणि पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. बीड नगर पालिकेच्या नगराध्यक्ष आणि नगरसेवक आरक्षण सोडतीनंतर आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची महत्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक दि.११ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता राष्ट्रवादी कॉंग्रेस भवन,बार्शी रोड,बीड येथे होणार असून या बैठकीस आमदार संदीप क्षीरसागर, माजी आमदार सय्यद सलीम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के आणि अन्य वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत नगर परिषद निवडणुकी संदर्भातील ▶ उर्वरित पान २ वर



# पाकिटमारांचा सुळसुळाट !



दिवाळी अगदी तोंडावर आल्याने सर्वत्रच्या बाजारपेठा रंगीबेरंगी कंदील, रांगोळ्या, पणत्या, विजेची तोरणे यांनी सजल्या आहेत. कपडे, भांडी, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांच्या दुकानांतही गर्दी दिसू लागली आहे. शहरासारख्या ठिकाणी लहान रस्ते, त्यावरील नियमित जाणारी वाहने, रस्त्याच्या कडेला फेरीवाल्यांनी थाटलेली दुकाने आणि त्यामध्ये दिवाळीचा सीजन यांमुळे प्रचंड गर्दी होऊ लागली आहे. या दिवसांत लोक परिवारासह खरेदीला बाहेर पडतात. त्यामुळे गर्दी आणखीनच वाढते. खरेदी करताना आपल्याला अनेक दुकानांत जावे लागते. अनेकदा खिशातील पाकीट काढून पैसे द्यावे लागतात. सध्याचे युग हे डिजिटल पेमेंटचे युग असल्याने अनेक जण युपीआय अॅप्सच्या माध्यमातून पेमेंट करतात त्यामुळे खिशातील मोबाईल वारंवार बाहेर काढावा लागतो. आपल्यासाठी ही नियमित बाब असली तरी लोकांच्या गर्दीत सहभागी झालेले खिसेकापू आणि पाकीटमार आपल्यावर बारीक लक्ष ठेवून असतात. संधी मिळताच गर्दीचा फायदा घेऊन खिशातील पाकीट, मोबाईल ते सहजपणे लंपास करतात. महिलांच्या दागिन्यांची सुद्धा या दिवसांत मोठ्या प्रमाणात चोरी होते. ऐन दिवाळीत संक्रांत कोसळल्याने ज्यांना असा अनुभव येतो ते बिचारे हताश होऊन जातात. दिवाळीचा फराळही त्यांना गोड लागत नाही. या दिवसांत पाकिट, मोबाईल, दागिने चोरीच्या अनेक घटना पोलीस स्थानकांत नोंदल्या जातात. त्यामुळे दिवाळीच्या खरेदीसाठी जाताना अंगावर अधिक दागिने न घालणे, पाकिटात बेताची रोख रक्कम ठेवणे, पाकीट आणि मोबाईल खिशात ठेवताना ते काळजीपूर्वक ठेवणे हेच अधिक इष्ट ठरेल.

– जगन घाणेकर

◆ पान ४ वरून पुढे...

## आ.सुरेश धस...

योजना, तसेच वैद्यकीय सल्ला या सर्व टप्प्यांवर रुग्णांच्या सोबत राहून मार्गदर्शन करतात. त्यामुळे शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ प्रत्येक गरजू रुग्णापर्यंत पोहोचवण्यात या उपक्रमाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या कार्याची प्रेरणा फक्त आणि फक्त आमदार सुरेश धस यांच्या जनतेसाठी सदैव तत्पर या कार्यपद्धतीतून मिळाली असल्याचं ग्रुपचे कार्यकर्ते सांगतात.

## छाया पांचाळ...

'बोंबामारो आंदोलन' आणि उपसंचालकांना काळे फासण्याचा इशारा दिला आहे. पार्श्वभूमी : छाया पांचाळ यांचा मृत्यू आणि चौकशी– १३ एप्रिल २०२५ रोजी प्रसुतीनंतर अतिरक्तस्रावामुळे छाया पांचाळ यांचा बीड जिल्हा रुग्णालयात मृत्यू झाला. या प्रकरणी वैद्यकीय अधिकारी आणि नर्स यांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. मृत महिलेच्या भावाने पोलीस ठाण्यात लेखी तक्रारही दाखल केली आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी डॉ. अर्चना भोसले–कीर्तक (अध्यक्ष, उपसंचालक आरोग्य सेवा लातूर परिमंडळ) यांच्या अध्यक्षतेखाली चार सदस्यीय समिती नेमण्यात आली होती : १. डॉ. डी. एस. चाकूरकर – जिल्हा शल्यचिकित्सक, धाराशिव. (समिती अध्यक्ष), २. डॉ. आरती वाडीकर – स्त्रीरोगतज्ञ, सामान्य रुग्णालय, उदगीर. ३. डॉ. सुनिता पाटील – वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, औसा. ४. डॉ. शशिकांत देशपांडे – सर्जन, सामान्य रुग्णालय, उदगीर. या समितीला चार दिवसांत चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, अजूनपर्यंत अहवाल सादर झालेला नसल्याची माहिती उपसंचालक पाठक यांनी दिली आहे. किस्किंदा पांचाळ यांचा आरोप– मुख्य दोषींवर कारवाई टाळत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत यांनी वैद्यकीय अधिकारी आणि नर्स यांना वाचवण्याचा प्रयत्न केला आहे. केवळ शस्त्रक्रिया परिचर मावशी यांच्यावरच निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. हा सरळसरळ अन्याय असून, 'रोग म्हशीला आणि इंजेक्शन पखालीला' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यांनी पुढे सांगितले की, शासन आणि प्रशासनाने या प्रकरणी लवकरात लवकर कारवाई करून दोषींना निलंबित करावे, तसेच मृत छाया पांचाळ यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी. महत्त्वाचे मुद्दे : प्रसुतीनंतर अतिरक्तस्रावामुळे छाया पांचाळ यांचा मृत्यू, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणाचा आरोप, दोषींना संरक्षण देण्याचा जिल्हा शल्यचिकित्सकांवर आरोप , बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत यांच्यावर प्रशासकीय कारवाईची मागणी. मावशीवर अन्यायकारक

◆ पान ४ वरून पुढे...

कारवाईचा आरोप, उपसंचालकांना आठ दिवसांचा अल्टिमेटम, अन्यथा आंदोलन न्यायाच्या प्रतीक्षेत पांचाळ कुटुंब – कुटुंबीय आता थेट लातूर येथील विभागीय आरोग्य प्रशासन दरबारी न्यायासाठी लढत असून, योग्य ती कारवाई न झाल्यास सामाजिक रोष भडकण्याची शक्यता नाकारता येत नाही. यांची सर्वस्व जबाबदारी शासन प्रशासनाचे राहील. या वेळी उपस्थित सुदर्शन बोराडे मानव विकास संरक्षण समिती जिल्हाध्यक्ष लातूर, शिवशक्ती भीम– शक्ती विचार मंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, मोहन पोद्दार जिल्हाध्यक्ष लातूर ओबीसी हक्क परिषद, सुदाम पांचाळ विश्वकर्मा विकास महामंडळ लातूर, मयत छाया पांचाळ यांचे पती गणेश पांचाळ, सामाजिक कार्यकर्त्या किस्किंदा पांचाळ यांनी म्हटले आहे.

## महाराष्ट्र राज्यामध्ये...

पेरिक्षा मध्ये माल आणून देतो असे आरोपीने सांगितले व आरोपी नामे शहादेव यांस अटक करून मा. न्यायालयात पुढे हजर केले असता दोन दिवसाचा पी. सी. आर. देऊन १५ दिवसाचा एम. सी. आर. केला होता. सदरील गुन्ह्यात आरोपीने अॅड. श्रीराज शेळके यांचे मार्फत जामीन अर्ज दाखल केला असता अॅड. श्रीराज शेळके यांचा युक्तीवाद धरून मा. जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीचा जामीन मंजूर केला. आरोपीच्या वतीने अॅड. श्रीराज शेळके यांनी महत्वपूर्ण बाजू मांडली व त्यांना अॅड. युवराज शेळके यांनी सहकार्य केले.

## बारा बलुतेदार...

जिवाजी महाले यांच्या जयंती निमित्त त्यांच्या पुतळ्यास बारा बलुतेदार महासंघाच्यावतीने दि. ९ ऑक्टोबर रोजी अभिवादन करण्यात आले. या अभिवादन सभेस बारा बलुतेदार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव दळे यांनी जिवाजी महाले यांच्या जीवन चरित्राची माहिती उपस्थितांना दिली. यावेळी बीड जिल्हा बारा बलुतेदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा भावसार समाजाचे जिल्हाध्यक्ष प्रकाशराव कानगांवकर, साळी समाज जिल्हाध्यक्ष राजु ताटे, भटक्या विमुक्त जमातीचे डॉ.रमेश कैवाडे, नाभिक समाजाचे गुलाब चव्हाण, किशोर शिंदे, एसबीसी संघटनेचे मुकेश शिवगण, परिट धोबी समाजाचे जिल्हा अध्यक्ष अॅड. सुधीर जाधव, रमेश घोडके, कोष्टी समाजाचे सुरेश असलेकर, रवी म्हेत्रे, एसबीसी संघटनेचे जिल्हाध्यक्ष दगडू म्हेत्रे, लोहार संघटनेचे अशोक आणेराव, भोई समाजाचे जिल्हाध्यक्ष संजय घेणे, दत्ता गुणवंत, गुरव समाजाचे जिल्हाध्यक्ष संजय गुरव, लोणार समाजाचे जिल्हाध्यक्ष अनिल मुळे, मुस्लिम ओबीसी परिषदेचे रफिक बागवान, सुतार समाजाचे जिल्हाध्यक्ष बापुराव भालेकर वाणी समाजाचे योगेश जी

◆ पान ४ वरून पुढे...

कानडे कुंभार समाजांचे धर्मा भाऊ करडकर गोसावी परिशदेचे अॅड.बन, जंगम समाजाचे उमेश स्वामी यांच्यासह बारा बलुतेदार महासंघाचे सर्व पदाधिकारी यांच्यासहसमाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १७ ऑक्टोबरचा....

पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. यावेळी समता परिषदेचे कार्याध्यक्ष तथा ओबीसी महामंडळाचे माजी अध्यक्ष बापूसाहेब भुजबळ, समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सत्संग मुंडे, रवीभाऊ सोनवणे, प्रवक्ते डॉ. नागेश गवळी, प्रा. संतोष वीरकर, मराठवाडा अध्यक्ष आबासाहेब खोत, चक्रधर उगले, परीट समाज संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष गणेश जगताप, सोनार समाजाचे नेते अॅड. संदीप बेदरे, मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे जिल्हाध्यक्ष प्रा. रफिक बागवान, सामाजिक कार्यकर्त्या किस्किंदाताई पांचाळ, वंजारी समाजाचे नेत्या मयुरीताई बांगर, मनोज घोडके, मधुकर झरेकर, बिबीशन खुणे, तानाजी फुले, नानासाहेब राऊत, दीपक वैद्य, रवींद्र खरात, माऊली शिरसाट, सुभाष लोंढे, या सभेचे आयोजक तथा समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस अॅड. सुभाष राऊत यांच्यासह समता परिषदेचे मराठवाड्यातील जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, ओबीसी मधील विविध समाजाचे प्रमुख पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मनोगत व्यक्त करताना मान्यवरांनी ओबीसी समाजावर स्वातंत्र्यपूर्व काळापासून होत असलेल्या अन्याय अत्याचाराची गाथा उपस्थितांसमोर व्यक्त केली. पुरातन काळापासून शूद्र समजल्या जाणाऱ्या ओबीसी समाजाला आजपर्यंत कुठल्याही सुविधा मिळाल्या नसल्याने या समाजाचा उत्कर्ष कोसो दूर राहिला आहे. ओबीसीचे राष्ट्रीय नेते छगनरावजी भुजबळ यांच्या माध्यमातून ओबीसी समाजासाठी मंडल आयोगाची अंमलबजावणी काही प्रमाणात का होईना करण्यात आली. ओबीसी समाजाला मंडल आयोगाचा फायदा होत नाही तोपर्यंतच महाराष्ट्र सरकारने हैद्राबाद गॅझेटियरचा जीआर काढून ओबीसी समाजावर मोठा अन्याय केला आहे. या अन्यायाच्या विरोधात ना. छगनरावजी भुजबळ साहेब विधिमंडळात आणि न्यायालयीन लढाई लढत आहेत. मात्र महाराष्ट्र सरकारला अद्यापही घाम फुटला नसल्याने आता रस्त्यावरील लढाई लढण्याची वेळ आली आहे. यासाठीच सदरील ओबीसी महाएल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या महाएल्गार मेळाव्याच्या माध्यमातून ओबीसी समाजाची ताकद महाराष्ट्र सरकारला दाखवून घ्यावी लागणार आहे. दडपशाहीच्या माध्यमातून राज्यात लागू करण्यात आलेल्या हैद्राबाद गॅझेटियरचा जीआर रद्द करण्यासाठी आता ओबीसी समाजाला देखील दडपशाही सुरू करावी लागणार आहे. त्याची पहिली झलक बीड येथे आयोजित या महाएल्गार

◆ पान ४ वरून पुढे...

मेळाव्यातून नक्कीच दिसेल असा विश्वास या बैठकीत उपस्थित प्रमुख पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. या बैठकीस माळी महासंघाचे प्रा. लक्ष्मण गुंजाळ, माजी नगरसेवक नामदेवराव दुधाळ, मोहन आघाव, केशव तांदळे, बापू गाडेकर, रणजीत सोन्नर, दिगंबर नाईकनवरे, जगन खेत्रे, कृष्णा शिंदे, महादेव दुधाळ, धनंजय काळे, नितीन साखरे, निखिल शिंदे, नितीन राऊत, अजिंक्य सुरवसे, अविनाश उगले, मुकुंद शिनगारे, संतोष रासवे, संजीवनीताई राऊत, सुभोष मुंडे, बाळू यादव, सावता काळे, उद्धव मुळे, उद्धव मेत्रे, दीपक भुजबळ, रावसाहेब राऊत, अनिकेत जिरे यांच्यासह मराठवाड्यातील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजर्षी शाहू कन्या...

तारा या वारंवार तुटण्यामुळे तसेच या ठिकाणी उघडे असलेल्या रोहित्रामुळे विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला असून त्यांच्या जीवीतास धोका निर्माण झाला आहे. संबंधित विभागाने दि.१५ ऑक्टोबर २०२५ पूर्वी शाळेच्या प्रांगणातील रोहित्र तात्काळ काढावे नसता रास्तो रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. पालक आणि शाळेच्या व्यवस्थापनाने वीज वितरण कार्यालय, बीड येथे अनेकदा तक्रार केली असली, तरी संबंधित विभागाचे अधिकारी अद्याप कार्यवाही करीत नाहीत. संबंधित ठिकाणी असलेली डी.पी.(क्र.४४१२१७८ – २०० केव्ही) हे उघडी आहे.

## 'श्री मंगलनाथ मल्टीस्टेट'चे...

महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन व राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त प्रथमच महाराष्ट्रातील सहकार चळवळ सक्षमीकरण करण्याकरिता आपले अमूल्य व महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करण्यासाठी हा पुरस्कार वितरीत करण्याचा ठराव घेण्यात आला. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व पतसंस्था व मल्टीस्टेट यांच्याशी समन्वय व विचारविनिमय करून प्रथम पुरस्काराचे मानकरी म्हणून श्री आर जी कानडे यांना नामांकित करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे उद्घाटक मा.नामदार राधाकृष्ण विखे पाटील साहेब जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य.तर प्रमुख उपस्थिती मध्ये मा.नामदार श्री प्रतापराव जाधव,राज्य मंत्री महाराष्ट्र राज्य, श्री संजय गायकवाड विद्यमान आमदार बुलढाणा, श्री संजय कुटे,विधानसभा आमदार, श्री सिद्धार्थ खरात, विधानसभा आमदार श्री वसंत जी खंडेलवाल आमदार बुलढाणा हे होते. श्री. आर.जी कानडे यांनी सहकार क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून कार्य करताना संस्थात्मक विकास, पारदर्शक व्यवहार व सदस्यहित यांचा उत्तम समन्वय साधला आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

## शिवाजीराव दादांनी...

असल्याचे गौरवोद्गार राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी काढले. माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी कीर्तन महोत्सवाचा समारोप ह.भ.प. महादेव महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाला. या कार्यक्रमात तालुक्यातील संत महंतांचा सत्कार करण्यात आला. शिवछत्र परिवारावर प्रेम करणारे हजारो लोक यावेळी उपस्थित होते. गेवराई येथे शुक्रवार दिनांक १० ऑक्टोबर रोजी माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील, श्रीक्षेत्र नारायणगडाचे महंत ह.भ.प. शिवाजी महाराज, श्री क्षेत्र चाकरवाडी संस्थानचे महंत ह.भ.प. महादेव महाराज, माजी आमदार विलासराव खरात, अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. अभिष्टचिंतन सोहळ्याच्या प्रारंभी गेवराई तालुक्यातील सर्व संत महंतांचा जयसिंग पंडित, पृथ्वीराज पंडित, रणवीर पंडित यांच्यासह सोहळा समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गेवराई तालुक्यातील विविध संस्थानचे संत महंत, नागरिक आणि अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्य अभिष्टचिंतन सोहळ्या नंतर काल्याचे कीर्तन संपन्न होऊन महाप्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी बोलताना हरिभाऊ बागडे म्हणालेकी, दादांचे ८८ वर्ष वय झाले असतानाही दादा आज तीच ऊर्जा घेऊन काम करत आहेत. म्हणून शिवाजीराव (दादा ) यांची शताब्दी याच ठिकाणी साजरी व्हावी व या कार्यक्रमाला माझ्यासह राज्याचे मुख्यमंत्री व सर्व मंत्रिमंडळ हजर राहून त्यांना शुभेच्छा देतील असा विश्वास व्यक्त केला. पुढे बोलतांना बागडे म्हणाले की, शिवाजीराव (दादा) चा राजकीय परिचय म्हणजे मी गेल्या ५० ते ६० वर्षांपासून त्यांची कारकीर्द पाहत आलो आहे. दादा राजकारणात आले आणि गेवराई तालुक्याचा कायपालट केला. दादांनी ४० वर्षाच्या राजकारणात विविध विकास कामे आणून गेवराई तालुक्याचा तर विकास केलाच पण मराठवाड्याच्या विकासातही त्यांचा मोलाचा वाटा आहे. आजही दादांच्या नेतृत्वाखाली त्यांचे मुलं या तालुक्याच्या राजकारणात सक्रिय काम करत असून त्यांचा यशस्वी वारसा चालवत आहेत. सहकार क्षेत्रात दादांचे मोठे काम आहे. गेल्या अनेक वर्षांपासून दादांनी गेवराई तालुक्यातील शेतकऱ्यांना ऊसाचे क्षेत्र वाढवण्यासाठी खूप प्रयत्न केले. मराठवाड्यात सहकार क्षेत्रात आदराने दादांचे नाव घेतले जाते. शिक्षण क्षेत्रातही दादांचे मोठे योगदान आहे. गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागात दादांनी शिक्षण संस्थाचे जाळे निर्माण करून शेतकऱ्यांची मुले साक्षर केली. शिवाजीराव दादा मंत्री आसतांना मी पण सभागृहात होतो. त्यांनी रोजगार हमी खाते यशस्वीपणे सांभाळले. या खात्यातून ग्रामीण भागातील जेवढा विकास झाला तेवढा विकास कोणत्याच खात्यातून झाला नाही. या खात्याच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रस्ते, पाझर तलाव झाले. अन त्याच काळात झालेल्या जलसंधारणाची कामे आज राज्यातील अनेक भागात सुपीकता दिसून येत आहे. मराठवाड्यातून वाहणाऱ्या कालव्यातही दादांचा मोठा वाटा आहे. राजकारणातील स्वच्छ चरित्र अन चांगली प्रतिमा असलेल्या नेत्याममध्ये दादांचे नाव अग्रक्रमाने येत आहे. राजकीय निवडणुकीतही दादांनी कधी कोणाचा द्वेष न करता एकोप्याने राजकारण केले. शेवटी दादांना उदंड अन निरोगी आयुष्य लाभावे आशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

◆ पान ९ वरून पुढे...

## पंकजा मुंडेंच्या...

मुंडे या वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्ष राहिलेल्या आहेत. हा कारखाना मंत्री पंकजा मुंडे यांनी शेतकऱ्यांच्या सोयीसाठी भाडेतत्त्वावर चालवण्यासाठी दिला होता. मात्र, संपूर्ण कारखाना विक्रीसाठी काढण्यात आल्याचा आरोप आता पुढे आल्याने सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, यापूर्वी पंकजा मुंडे यांच्या ताब्यातील पनगेश्वर साखर कारखान्याची विक्री झाली होती. त्यामुळे गोपीनाथ मुंडे यांनी उभा केलेल्या वैद्यनाथ साखर कारखान्याच्याही भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. खरेदीखत रोखण्याची मागणी– परळी आणि पांगरी परिसरातील शेतकऱ्यांना ऊस गाळपासाठी जवळचा पर्याय उपलब्ध व्हावा, यासाठी गोपीनाथ मुंडे यांनी हा कारखाना उभारला होता. त्यामुळे या कारखान्याची विक्री झाल्याच्या चर्चांनी मोठं वादळ निर्माण झालं आहे. वैद्यनाथ साखर कारखान्याची खरेदीखत रोखण्याच्या मागणीसाठी परमेश्वर गीते यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज देखील केले आहे. आता या प्रकरणात नेमकी काय माहिती समोर येणार ? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. काय म्हणाले परमेश्वर गीते ? – याबाबत कायदा विषयक सल्लागार परमेश्वर गीते म्हणाले की, वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना हा गोपीनाथ मुंडे यांच्या संकल्पनेतून स्थापन करण्यात आला होता. त्यांच्या पश्चात शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी कामगारांच्या हिताचे निर्णय घेणे आवश्यक होते. मात्र, त्यांच्या हिताच्या विरुद्ध निर्णय घेतल्याने हा कारखाना कर्जबाजारी झाला. युनियन बँक ऑफ इंडिया मार्फत तो कारखाना ओमकार साखर कारखाना प्रायव्हेट लिमिटेडला विक्री करण्यात आला आहे. १४ ऑगस्ट २०२५ रोजी खरेदीखत नोंदवण्यात आलेले आहे . खरेदीखत ऑफलाइन नोंदवल्यामुळे त्या कारखान्याचे योग्य मूल्यांकन करण्यात आलेले नाही. १३१ कोटी ९८ लाख रुपयांच्या कवडीमोल रकमेत कारखाना विक्री करण्यात आलेला आहे. हा कारखाना विक्री करण्याचा निर्णय शेतकऱ्यांच्या हिताच्या विरोधातील आहे. शेतकरी आणि सभासदांचे भांडवल बुडाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे राज्य शासनाने हस्तक्षेप करून खरेदी खत व्यवहार रद्द करावा. शासनाकडून कारखान्याला मदत मिळावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## कपिलधारवाडी व हिंगणी...

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रशांत वाघमारे, तसेच महसूल, ग्रामविकास, पोलीस, पाणीपुरवठा, महावितरण, आरोग्य, भूमी अभिलेख आदी विभागांचे अधिकारी तसेच संबंधित गावांचे सरपंच, ग्राम महसूल अधिकारी, ग्राम पंचायत अधिकारी आणि मंडळ अधिकारी उपस्थित होते. पुनर्वसन प्रक्रियेत उद्भवणाऱ्या अडचणी, पर्यायी स्थळांची निवड आणि आवश्यक मूलभूत सुविधांची उपलब्धता यावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. जिल्हा प्रशासनामार्फत पुनर्वसित नागरिकांना सर्वतोपरी मदत केली जाईल, असे आश्वासन मा. जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

## जिल्हा परिषद...

मागास प्रवर्ग महिला, सर्वसाधारण प्रवर्ग, सर्व साधारण प्रवर्ग महिला यांच्याकरीता आरक्षीत जागा निश्चित करण्याकरिता मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बीड येथे दिनांक १३.१०.२०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजता होणार असल्याचे चंद्रकांत शेळके तहसीलदार बीड यांनी कळविले आहे

## दिवाळीनंतर निवडणुकीचा...

समोर आली आहे. तर पहिल्या टप्प्यात जिल्हापरिषद, पंचायत समिती तर

◆ पान ९ वरून पुढे...

दुसऱ्या टप्प्यात नगरपरिषद आणि नंतर महानगरपालिका अशा निवडणूक होणार असे दिसून येत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, ३१ जानेवारी २०२६ च्या आतमध्ये राज्यातील निवडणुका घेण्यासाठी आयोगाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. पंचायत समिती आणि नगर परिषदेचे आरक्षण जाहीर करण्यात आले असून लवकरच मनपाचेही आरक्षण जाहीर करण्यात येणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तारखेबाबत महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. त्याशिवाय शिक्षकांची इलेक्शन ड्युटी लावण्यात आली आहे, त्यानुसार निवडणुकीच्या तारखांचा अंदाज वर्तवला जातोय. राज्यातील शिक्षकांची जानेवारीपयरत इलेक्शन ड्युटी लावल्याचे समोर आले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, दिवाळीनंतर २७ ते ३१ ऑक्टोबर यादरम्यान आयोगाकडून पहिल्या टप्प्यातील निवडणुकीची घोषणा करण्यात येणार आहे. नोव्हेंबर अखेर अथवा डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक होऊ शकते. तर दुसऱ्या टप्प्यात नगरपालिका आणि नगर परिषदाची निवडणूक होण्याची शक्यता आहे.

## 'तुझं कॅरेक्टर...

शेतकऱ्याला दाबदडप करत असल्याचा व्हीडीओ सोशल मीडियात व्हायरल झाला आहे. सात बारा दाखव असं म्हणत पोलीस कर्मचारी तुझं कॅरेक्टर खराब करून टाकेल अशी धमकीच देत असल्याचे व्हीडीओ मध्ये दिसत आहे. या प्रकारामुळे झाले असून अतिशय गंभीर आहे. बीड तालुक्यातील चौसाळ्या पासून जवळच शेतकरी भयभीत ज्यांच्याकडून न्यायाची अपेक्षा आहे.पोलीस अशा प्रकारे दाबदडप करून थेट शेतकऱ्यांचेच कॅरेक्टर खराब करण्याची धमकी देत असतील तर ही बाब गंभीर आहे. कानडीघाट येथील गणेश झोडगे नामक शेतकऱ्याच्या गट नंबर ४४९ मधील शेतातून १०० फुट अॅटो पॉवर या कंपनीची २२० के. व्ही. व्होल्टेज असलेली तार शेतीतून गेलेली आहे. त्याचा मोबदला शेतकऱ्यास मिळालेला नाही. मोबदल्याची मागणी केली असता – पोलीस शेतकऱ्याला धमक्या देत आहेत. झोडगे यांच्या शेतात प्रत्यक्ष गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी तुझा सातबारा दाखव असे म्हणत तुझं कॅरेक्टर खराब करून टाकील अशी धमकी दिल्याचा एक व्हीडीओ सोशल मीडियात व्हायरल झाला आहे. त्यामध्ये दोन पोलीस कर्मचारी शेतकऱ्याला दाबदडप करुन त्याला बाजुला करण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येत आहे. गणेश झोडगे यांच्यासह भास्कर झोडगे व तेथील अनेक शेतकऱ्यांना अद्याप मोबदला मिळालेला नाही. मोबदल्याची मागणी केल्यास पोलीस अशा पद्धतीने दमदाटी करत असल्याने शेतकऱ्यांमधून संताप व्ये होऊ लागला आहे. आम्ही पुण्यामध्ये एमपीएससी, युपीएससीचा अभ्यास करत आहोत आणि पोलीस कर्मचारी आमचंकरियर खराब करणारअशी धमकी सगळ्यांसमोर देत असल्याचे गणेश झोडगे, कुडके यांनी म्हटले आहे.बीड जिल्ह्यातील शेतकरी ओल्या दुष्काळामुळे आधीच आर्थिक संकटात सापडला असून त्यातच पोलिस दाबदडप करून कॅरेक्टर खराब करण्याची धमकी देत असल्याने शेतकऱ्याला संताप व्ये होत आहे.

## बीड जिल्ह्यात अतिवृष्टीग्रस्त ...

प्रशासनाच्या निर्दर्शनास आले आहे. सदर यादी प्रशासनामार्फत तयार केलेली नाही. या यादी बाहेरील गावांमध्ये नुकसान झालेले नाही, असा चुकीचा संदेश समाजमाध्यमांतून प्रसारित होत आहे. त्यामुळे याद्वारे सर्वसामान्य नागरिकांना स्पष्ट करण्यात येते की, व्हायरल होत असलेली यादी अधिकृत नसून प्रशासनाने ती जारी केलेली नाही. पंचनामे अद्याप

◆ पान ९ वरून पुढे...

सुरू असून नुकसानीबाबतची माहिती शासनास योग्य मार्गाने सादर केली जाईल. नागरिकांनी अशा प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये. प्रशासनास सहकार्य करावे व केवळ अधिकृत माध्यमांद्वारेच माहितीचा स्वीकार करावा. जिल्हा प्रशासन आपल्या नागरिकांच्या पाठीशी आहे व शेतकऱ्यांच्या नुकसानीसंदर्भात तातडीने योग्य कार्यवाही करण्यात येत असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## शेतकरी कर्जमाफीसाठी....

५०,००० इतकी आर्थिक मदत तातडीने मंजूर करण्यात यावी. तसेच, मराठवाड्यातील व सोलापूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करण्यात यावी. तसेच ज्ञानराधा बँकेच्या ठेवीदारांचे संरक्षण व थकीत रक्कम परत देण्याबाबत ज्ञानराधा बँकेची सर्व स्थावर व जंगम मालमत्ता शासनाच्या ताब्यात घेऊन लिलाव प्रक्रिया राबवून त्यातून मिळालेल्या उत्पन्नातून ठेवीदारांचे पैसे तातडीने परत करण्यात यावेत. शेतकरी कर्जमाफी करण्यात यावी. अशा विविध मागण्यासाठी कोरेडेवाडीत राजेश्रीताई राठोड यांचे गेल्या सात दिवसा पासुन आमरण उपोषण सुरु आहे. मात्र या उपोषणाची प्रशासकीय यंत्रणा तसेच सरकारकडून कोणीच दखल घेत नसल्याने. आज दिनांक ९ ऑक्टोबर, गुरुवार रोजी शेतकरी राजा सामाजिक समितीचे प्रदेशाध्यक्ष रोहित धुरंधरे यांच्या मार्गदर्शनाने समितीचे मराठवाडाध्यक्ष प्रवीणजी पालिमकर, बीड तालुका अध्यक्ष अशोक ढोले पाटील, यांनी उपोषण करत्या सारिकाताई राठोड यांची उपोषण स्थळी कोरेडेवाडीत जाऊन भेट घेतली. व त्यांच्या प्रकृतीची विचारणा केली. यावेळी शेतकरी राजा सामाजिक समितीचे मराठवाडाध्यक्ष प्रवीणजी पालीमकर, बीड तालुका अध्यक्ष अशोक ढोले पाटील, यांनी प्रशासनावर त्रिव नाराजी व्यक्त केली. त्यांनी बोलताना सांगितले की आज सात दिवस झाले एक महिला रणरागिनी आपल्या गावात शेतकऱ्यांच्या मागणीसाठी निस्वार्थपणे विना अन्न–पाण्याशिवाय अमरण उपोषण करत आहे. तरी त्यांच्या उपोषणाची दखल घ्यायला शासन प्रशासनाकडे वेळ नाही. जगाचा पोशिंदा आज संकटात सापडलेला आहे. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी करावी. निस्वार्थपणे शेतकऱ्यांच्या मागण्यासाठी हे अमरन उपोषणरण सुरु आहे. आज सात दिवस झाले विना अन्न–पाण्याविना ही भगिनी उपोषणाला बसली असून त्यांची प्रकृती खूपच चिंताजनक होत चालली आहे. तरी सरकारने लवकरात लवकर त्यांच्या सर्व मागण्या पूर्ण करून त्यांचे उपोषण लवकरात लवकर सोडवावे. अशी शेतकरी राजा सामाजिक समिती कडून मागणी करण्यात आली. यावेळी शेतकरी राजा सामाजिक समिती मार्फत त्यांच्या अमरण उपोषणाला पाठिंबा देण्यात आला. यावेळी उपस्थित शेतकरी राजा सामाजिक समीती मराठवाडाध्यक्ष प्रवीणजी पालीमकर, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज शौर्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील, वैष्णवी ताई मोरे, शेतकरी राजा सामाजिक समीतीचे बीड, तालुकाध्यक्ष अशोक दादा ढोले पाटील, युवा कार्यकर्ते प्रकाश तावरे, रुग्णसेवक महेश जाधव, युवा उद्योजक महेश आण्णा मते, तसेच गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड नगर...

संघटनात्मक तयारी, उमेदवार निवड प्रक्रिया, प्रचार आराखडा आणि पक्ष बळकटीकरण यावर सविस्तर चर्चा होणार आहे. बीड शहरातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवारांना वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) तर्फे आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# राजकारणांत समोरा - समोर लढु परंतु सामाजिक प्रश्नी कायम सर्वांसोबत: आमदार प्रकाश सोळंके

## जलगावात छ.शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकांचे भुमिपुजन

**शहरातील जुन्या बसस्थानकात भव्यदिव्य असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक होणार असनु नविन बस्थानकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक होणार आहे. या स्मारकाच्या भुमिपुजनाचे आयोजन शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, धनंजय सोळंके, अभिजित कोंबडे यांनी केले होते.**

माजलगाव । प्रतिनिधी

राजकारणांत समोरा – समोर लढु परंतु सामाजिक प्रश्नी कायम सर्वांसोबत असल्याचे आमदार प्रकाश सोळंके यांनी सांगीतले. शहरातील नविन बसस्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचे तर जुन्या बसस्थानकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक होणार असुन या स्मारकाच्या भुमिपुजन कार्यक्रमात दि. १० शुक्रवारी ते बोलत होते.



अध्यक्षस्थांनी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप हे तर उद्घाटक म्हणुन आमदार प्रकाश सोळंके होते. या कार्यक्रमास माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, बाबुराव पोटभरे, अच्युत लाटे, दयानंद स्वामी, उपसभापती श्रीहरी मोरे, जयसिंह सोळंके, विरेंद्र सोळंके, खुर्शिद नाईक, सभापती जयदत्त नरवडे, विजय साळवे, अविनाश जावळे, डॉ. अशोक तिडके, खलील पटेल, कचरू खळगे, नासेर पठाण, सुरेंद्र रेदासनी नवनाथ धाईजे, अभिजित पोटभरे, अभय होके पाटील, भिमराव टाकणखार, अरूण राउत, अर्जुन नाईकनवरे, धम्मानंद साळवे, भास्कर शिंदे, राजेश साळवे, अमोल शेरकर, संतोष जेथलिया ईश्वर खुरपे सिध्दार्थ ससाणे, राकेश साळवे, दिनकर शिंदे, उमेश मोगरेकर, कमलेश जाब्रस विलास नेमाणे, विठ्ठल तुपसौंदर, अभिजित कोंबडे, आगार प्रमुख सुहास कोळपकर मुख्याधिकारी पोपट निघळ यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना आ. सोळंके म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक व दोन्ही चौकांचे सुशोभिकरण दर्जेदार करण्यात येणार आहे असे सांगीतले तर बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी सांगीतले की, महापुरूषांचे स्मारक यातुन त्यांची प्रेरणा मिळते. हे दोन्ही स्मारक माजलगावकरांच्या अस्मितेचा प्रश्न होता. मार्गी लागला यामागे सर्व माजलगावकरांचे श्रेय आहे. यावेळी माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील यांनी १९७८ पासुन या दोन्ही स्मारकांच्या पाठपुराव्याचा आलेख सर्वांसमोर मांडला तर यावेळी विजय साळवे, अविनाश जावळे, दयानंद स्वामी यांनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन धनंजय सोळंके तर आभार तालुकाप्रमुख तुकाराम येवले यांनी मानले.

**माजलगाव मतदारसंघामध्ये नगरविकास खात्यामार्फत उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी भरिव निधी दिलेला असल्याने मोठ्या प्रमाणावर विकास कामे झाली आहेत. शहरामध्ये होत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य – दिव्य स्मारकांकरीता ना. एकनाथराव शिंदे यांचेकडुन मोठ्या प्रमाणावर निधी आणण्यात येईल. आगामी नगरपालिका निवडणुकीत माजलगाव नगरपालिकेचे नगराध्यक्षपद शिवसेनेसाठी सोडावे असेही शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी सांगीतले.**

# बीड नगरपरिषद निवडणुक अनुषंगाने आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बैठक: खुर्शीद आलम

बीड । प्रतिनिधी

आगामी बीड नगर परिषद निवडणूक २०२५ अनुषंगाने आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची महत्वपूर्ण बैठक आ.संदिपभैया क्षिरसागर जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, माजी आ सय्यद सलीम, उषाताई दराडे, ज्येष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस भवन, बार्शी रोड, बीड येथे शनिवारी सकाळी १० वा.बैठक आयोजित केली आहे. अशी माहिति शहर अध्यक्ष खुर्शीद आलम यांनी दिली आहे.



बऱ्याच वर्षापासून लांबलेल्या नगरपरिषदांच्या निवडणुकांचा बिगुल वाजला आहे. प्रभाग रचना, नगरअध्यक्षपदाचे आरक्षण, प्रभागाचे आरक्षण, मतदार यादी प्रसिद्धी निवडणूक प्रक्रिया वेगाने सुरू आहे. नागरिकांच्या पसंतीचा नगराध्यक्ष आणि आपल्या हक्काचा नगरसेवक नगर परिषदेमध्ये पाठवण्यासाठी बीड शहरातील नागरिक उत्सुक आहेत. शहराच्या विकासाला गतिमान करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने नगर परिषदांच्या निवडणुकीत सक्षमपणे उतरण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने बीड नगरपरिषद निवडणुक पक्ष ताकतीने उतरणार आहे. नगराध्यक्ष आणि जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्याच्या अनुषंगाने आज बीड शहरातील राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे सर्व ज्येष्ठ नेते,पदाधिकारी,कार्यकर्ते यांची संयुक्तिक बैठक घेऊन पुढील दिशा ठरवली जाणार आहे. आघाडी असावी की स्वतंत्र निवडणूक लढवावी, नगराध्यक्ष व नगरसेवक उमेदवार कोण असावेत अशा विविध विषयावर सांगोपांग चर्चा होणार आहे. बीड शहरातील राष्ट्रवादी पक्षाचे नेते, पदाधिकारी आणि सर्व कार्यकर्त्यांनी, इच्छुक उमेदवारांनी या बैठकीस उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी केले आहे.

# रिपाइंच्या संभाजी गायकवाड यांची भटके-विमुक्त आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी निवड; पप्पू कागदे यांच्या हस्ते दिले नियुक्ती पत्र

बीड । प्रतिनिधी



रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून विविध आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवून अनेक वर्षांपासून चळवळीत काम करणारे बीड शहरातील बलभिम नगर पेठ बीड येथील संभाजी मारोती गायकवाड यांची दि.९ ऑक्टोबर २०२५ रोजी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पूजी कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत यांची भटके-विमुक्त आघाडीच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली.निवडी प्रसंगी नवनिर्वाचित भटके-विमुक्त आघाडीचे जिल्हाध्यक्ष संभाजी गायकवाड म्हणाले की, रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचे हात बळकट करण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पूजी कागदे यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील गाव-गावामध्ये भटके-विमुक्त समाजातील युवकांचे संघटन करून मजबूत पक्ष बांधणीचे काम आगामी काळात इमाने इतबारे करणार आहे. या निवडी प्रसंगी राजू जोगदंड, अविनाश जोगदंड, प्रभाकर चांदणे, नागेश आण्णा दुबळे, अक्षय कोकाटे, के. के. कांबळे, रतन वाघमारे, पप्पू वाघमारे, सन्नी जोगदंड, अमोल मिटकर, लखन जाधव, विजय डोळस, अभिषेक जोजारे, रोहित गायकवाड, करण वाघमारे, अशोक भाले, राम पवार, तुषार गायकवाड, साईनाथ जाधव, रोहित डोंगरे, आदी उपस्थित होते.

# दिवाळीनिमित्त दैनिक समर्थ राजयोगच्या वतीने फराळ आणि पूरग्रस्त बाधित विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

बीड । प्रतिनिधी

यावर्षी बीड संपूर्ण मराठवाड्यामध्ये परतीच्या पावसाने आहाकार केला. मोठ्या प्रमाणामध्ये जलप्रलय झाल्याने शेतीसह घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. बीड जिल्ह्यातील ज्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे अशा विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप आणि दिवाळीनिमित्त फराळ स्नेह मिलन कार्यक्रमाचे आयोजन दैनिक समर्थ राजयोग परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा लाभ बीड जिल्ह्यातील तमाम पत्रकार यांच्यासह पत्रकार प्रेमी नागरिक, प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी यांनी घ्यावा असे आवाहन संपादक वैभव स्वामी यांनी केले आहे. बीड जिल्ह्यामध्ये यावर्षी मोठ्या प्रमाणात परतीचा पाऊस झाला. या पावसाने मोठ्या प्रमाणात शेतीचे आणि नदी काठावरील वस्त्यांचे, घरांचे नुकसान झाले आहे.ज्या विद्यार्थ्यांचे पुराच्या पावसामध्ये शैक्षणिक साहित्य वाहून गेले, अथवा पावसाने भिजल्यामुळे खराब झाले, अशा गरीब गरजूवंत विद्यार्थ्यांना दैनिक समर्थ राजयोग परिवाराच्या वतीने दिवाळीनिमित्त शैक्षणिक साहित्य देऊन त्यांना या संकटात मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बीड जिल्ह्यातील ज्या विद्यार्थ्यांचे या पुरामुळे वह्या, पुस्तके, शैक्षणिक साहित्य यांचे नुकसान झाले आहे अशा विद्यार्थ्यांनी,अथवा बीड जिल्ह्यातील बाधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी ९४ २२ ७४ ३७ ९२ या व्हाट्सअप नंबर वर संपर्क साधून नोंद करावी. या विद्यार्थ्यांना दिवाळीनिमित्त आयोजित स्नेहमिलन कार्यक्रमांमध्ये फराळासह मान्यवरांच्या शुभहस्ते शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येणार आहे.

### दानशूरांना आवाहन...

**बीड जिल्ह्यातील पूरग्रस्त बाधित विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यासाठी दानशूरांनी शैक्षणिक साहित्य प्रत्यक्ष दैनिक समर्थ राजयोगचे मुख्य कार्यालय सम्राट चौक, शाहूनगर कॉर्नर, बीड येथे आणून द्यावे. अथवा शैक्षणिक साहित्यासाठी आपल्या इच्छेनुसार ९८ २२ ६२ ८५ २१ या फोन पे नंबर वर आर्थिक सहकार्य करून या कार्यक्रमासाठी आपला हातभार लावावा. जे व्यक्ती, संस्था या उपक्रमामध्ये आपला सहभाग देतील त्यांची नावे जाहीर करून सामाजिक योगदानासाठी त्यांचे उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र देऊन अभिनंदन करण्यात येणार आहे. (जर कोणाला आपले नाव जाहीर करायचे नसेल तर त्यांचे नाव गुपित राहील.) दानशूर इच्छुकांनी मोठ्या मनाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी सढळ हाताने आर्थिक मदत करावी असे आवाहन संपादक वैभव स्वामी यांनी केले आहे.**

# १७ ऑक्टोबरचा ओबीसी समाजाचा महाएल्गार मेळावा रेकॉर्ड ब्रेक होणार

## समता परिषद आणि सकल ओबीसी संघटनांच्या बैठकीत पदाधिकाऱ्यांचा निर्धार!

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र सरकारने मराठा समाजासाठी हैद्राबाद गॅझेटियरचा जीआर काढून मराठा समाजाचे ओबीसीकरण करण्यासाठी मुभा दिली असल्याने राज्यातील ओबीसी समाजामध्ये राज्य सरकारच्या विरोधात प्रचंड असंतोष पसरला आहे. सदरील हैद्राबाद गॅझेटियरचा जीआर महाराष्ट्र सरकारने तात्काळ रद्द करावा या प्रमुख मागणीसाठी शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी बीड येथे ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ओबीसी समाजाचा महाएल्गार मेळावा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद आणि सकळ ओबीसी समाज संघटनांच्यावतीने आयोजित केला असून हा महाएल्गार मेळावा रेकॉर्ड




ब्रेक होणार असल्याचा निर्धार समता परिषद आणि ओबीसी समाजातील विविध संघटनांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत करण्यातआला आहे. ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी बीड येथे संपन्न होणाऱ्या ओबीसी महाएल्गार सभेच्या पूर्व नियोजनासाठी आज शुक्रवार रोजी बीड येथील हॉटेल नीलकमल येथे मराठवाड्यातील प्रमुख ▶ उर्वरित पान २ वर

### सोमवारी ह.भ.प. सौ सुषमा कुलकर्णी यांची प्रवचन सेवा



बीड । प्रतिनिधी

शहरातील बार्शी रोड वरील स्वराज्य नगर येथील रहिवाशी व बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कीर्तनकार, ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या माऊली निवास्थानी प्रतीवर्षा प्रमाणे यावर्षी ही चातुर्मास उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे, आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या पवित्र पर्वकाळात प्रती सोमवारी रात्री ८ ते ९ यावेळेत विविध ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रेमी महाराज मंडळींची श्री ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा संपन्न होत आहे. या चातुर्मास उत्सवा निम्मित सोमवार दिनांक १३/१०/२५ रोजी रात्री ८ते९ या वेळेत सौ सुषमा कुलकर्णी यांची प्रवचन सेवा होणार आहे. सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके काठवडेकर या फेसबुक अकाऊंट वरून होणारअसून,या चातुर्मास उत्सवात आपण सर्वांनी सहभागी होऊन श्री ज्ञानेश्वरी प्रवचन श्रवणनाच लाभ घ्यावा असे आवाहन ह भ प माधव महाराज डाके यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आह.

# ओला-उबर, रॅपिडोसह सर्व ॲप आधारित सेवांसाठी नवे मानक ठरवले जाणार – मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील ॲप-आधारित प्रवासी वाहतूक सेवांमध्ये (उदा. ओला, उबर, रॅपिडो) अधिक शिस्तबद्धता, पारदर्शकता आणि प्रवासी सुरक्षेसाठी महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र मोटर वाहन ग्रीगेटर नियम, २०२५' या मसुदा नियमांची घोषणा केली. हे नियम मोटर वाहन कायदा, १९८८ च्या कलम ७३, ७४ आणि ९३ अंतर्गत प्रस्तावित असून, १७ ऑक्टोबर २०२५ पर्यंत या हरकती व सूचना मागविण्या आल्या असून त्यानंतर लागू होईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.या नव्या नियमांमुळे ग्रीगेटर कंपन्या, चालक आणि प्रवासी यांच्यातील संबंध अधिक पारदर्शक होतील तसेच भाडे, सेवा



गुणवत्ता, चालकांचे हक्क आणि प्रवासी सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण बदल होणार आहेत.

नियम यांना लागू होणार- हे नियम ई-रिक्षासह सर्व प्रवासी मोटार वाहनांच्या ग्रीगेटरना लागू होतील. म्हणजेच, ओला-उबरसारख्या कॅब सेवांसोबत ई-रिक्षा सेवा देखील या चौकटीत येतील. तसेच, बाईक-टॅक्सी सेवांसाठी स्वतंत्र महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम, २०२५ लागू राहतील आणि त्यासाठी वेगळा परवाना घ्यावा लागेल.

परवाना शुल्क आणि सुरक्षा ठेव- राज्य परिवहन प्राधिकरण (प्रति जिल्हा) परवाना देणे ₹१०,००,०००, परवाना नूतनीकरण ₹२५,०००

प्रादेशिक परिवहन प्राधिकरण (प्रति जिल्हा)

परवाना देणे ₹२,००,०००, परवाना नूतनीकरण ₹५,०००

याशिवाय ग्रीगेटरला वाहनसंख्येप्रमाणे सुरक्षा ठेव द्यावी लागेल.

वाहनांची संख्या १०० बस किंवा १००० वाहनांपर्यंत- सुरक्षा ठेव – १० लाख, वाहनांची संख्या १००० बस किंवा १०,००० वाहनांपर्यंत – सुरक्षा ठेव – २५ लाख, वाहनांची संख्या १००० हून अधिक बस किंवा १०,००० हून अधिक वाहने सुरक्षा ठेव – ५० लाख

भाड्याचे नियमन- सर्ज प्राइसिंग : मागणी वाढल्यास प भाडे वाढवू शकेल, परंतु ते प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने ठरवलेल्या मूळ भाड्याच्या दिड पटापेक्षा जास्त नसावे.

मागणी कमी झाल्यासही भाडे मूळ दराच्या २५ टक्के पेक्षा कमी ठेवता येणार नाही.

सुविधा शुल्क : राइडरकडून आकारले जाणारे सुविधा शुल्क मूळ भाड्याच्या ५ टक्के पेक्षा जास्त नसावे, आणि एकूण कपात मूळ भाड्याच्या १० टक्के पेक्षा अधिक नसावी.

**जाहीर प्रगटन**

**मा.श्रीमती एस.डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १४८५/२०२५
छाया बागडे व निरंक

मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदार:१. छाया भ्र. विष्णु बागडे, वय: ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. गारखेड परिसर, छ. संभाजीनगर ह.मु. जुना बाजार, बीड ता जि.बीड, २. वैभव पि. विष्णु बागडे, वय २८ वर्षे, धंदा – व्यापार, रा. सदर, ३. शुभम पि. विष्णु बागडे, वय २६ वर्षे, धंदा–व्यापार, रा. सदर, ४. ज्ञानेश्वर पि. विष्णु बागडे, वय २५ वर्षे, धंदा–व्यापार, रा. सदर, ५. आसराबाई भ्र. कांता बागडे, वय: ८० वर्षे, धंदा घरकाम, रा. लोणी ता. शिरुर कासार जि. बीड ह.मु. जुना बाजार, बीड ता. जि.बीड

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे विष्णु पि. कांताराव बागडे राहणार – रा. जुना बाजार बीड, ता.जि.बीड हे दिनांक ०९.०४. २०२५ रोजी जुना बाजार बीड ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत व अर्जदार क. ५ ही मयताची आई आहे. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे विष्णु पि. कांताराव बागडे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत विष्णु पि. कांताराव बागडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख ३०/१०/२०२५ आहे.

आज दिनांक १०/१०/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

(विधीज्ञ ॲड संजोत महाजन)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**

**मा. वसंत एस. यादव साहेब, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: १५१७/२०२५
जिजाबाई व इतर वि– निरंक

ज्याअर्थी मयत नामे बाळु महादेव बहिरवाळ रा. मंझरी (हवेली) ता. जि. बीड हे दि. १९०७.२०२५ रोजी मौजे विवेकानंद हॉस्पीटल बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार– (१) जिजाबाई महादेव बहिरवाळ वय ७९ वर्षे धंदा घरकाम रा. मंझरी (हवेली) ता. जि. बीड (२) लहानाबाई बाळु बहिरवाळ वय ४२ वर्षे धंदा– घरकाम रा. मंझरी (हवेली) ता. जि. बीड. ३) शुभम बाळु बहिरवाळ वय २६ वर्षे धंदा– शेती रा. मंझरी (हवेली) ता. जि. बीड ४) सुरेखा बाळु बहिरवाळ वय २५ वर्षे धंदा घरकाम रा. मंझरी (हवेली) ता.जि.बीड (५) सागर बाळु बहिरवाळ वय २१ वर्षे धंदा– शिक्षण रा. मंझरी (हवेली) ता. जि. बीड

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे बाळु महादेव बहिरवाळ रा. मंझरी (हवेली) ता. जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज ०६/१०/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख : १७.११.२०२५

(मार्फत ॲड. ए.डी. धांडे बीड)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार, दि. ११ ऑक्टोबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### भूमि अभिलेख अदालतीचे 13 ऑक्टोबर रोजी आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

भूमि अभिलेख विभागात उप अधीक्षक भूमि अभिलेख, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख व उपसंचालक भूमि अभिलेख, यांचे स्तरावर अर्धन्यायीक स्वरूपाचे कामकाज चालते. तथापी सदरचे विविध टप्प्यावर प्रलंबित असलेल्या अर्धन्यायीक प्रकरणांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने सदर प्रकरणांत संबंधितांना न्यायदानास विलंब होत आहे. महसूल मंत्री यांच्या निर्देशानुसार विविध टप्प्यावर प्रलंबित असलेल्या अर्धन्यायीक प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी भूमि लोक अदालतीचे आयोजन १३ ऑक्टोबर, २०२५ रोजी करण्यात आलेले आहे. ही भूमि अभिलेख लोकअदात सकाळी ११.०० वाजेपासून भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी, छत्रपती संभाजीनगर दमडी महल, पंचायत समिती शेजारी, गणेश कॉलनी, छत्रपती संभाजीनगर - ४३१००१ येथे आयोजन करण्यात आले आहे. भूमि लोक आदालतीच्या माध्यमातून जनतेला जलद गतीने न्याय मिळवून देणे तसेच एकंदरीत समाजामध्ये सलोखा आणि सामंजस्य निर्माण होऊन सौहार्दपूर्ण वातावरण निर्मितीसाठी शासनाने सकारात्मक पाऊल उचलले आहे. त्याचाच एक भाग म्हणून भूमि लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. सबब प्रलंबित असलेली अर्धन्यायीक स्वरूपाची प्रकरणे जलद गतीने निपटारा होण्यासाठी तसेच सर्व संबंधित नागरिकांचे वेळेची बचत होण्याचे दृष्टीने भूमि अभिलेख विभागातील उपसंचालक, भूमि अभिलेख, छत्रपती संभाजी नगर प्रदेश, छत्रपती संभाजी नगर यांचे स्तरावर प्रलंबित असलेल्या अर्धन्यायिक प्रकरणात भूमि लोक अदालतीचे आयोजन दिनांक १३ ऑक्टो, २०२५ रोजी करण्यात आले आहे. तरी सर्व संबंधित पक्षकार, वादी/प्रतिवादी, अपीलदार/जाबदार, त्यांचे विधीज्ञ व नागरिक यांना आवाहन करण्यात येते की, उपसंचालक भूमि अभिलेख, छत्रपती संभाजी नगर यांचे स्तरावर प्रलंबित असलेल्या सर्व प्रकारच्या अर्धन्यायीक प्रकरणात तडजोडीने प्रकरण निकाली करणेबाबत दिनांक १३ ऑक्टोबर, २०२५ रोजी आयोजित केलेल्या भूमि लोक अदालतीमध्ये सर्व संबंधितांनी उपस्थित राहून आपली प्रकरणे तडजोडीने निकाली करणेबाबत आवश्यक ते सहकार्य करावे.

### श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर बीड येथे काकडा भजनास प्रारंभ



**बीड । प्रतिनिधी**

वर्षभर धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमाची रेलचेल असते सिद्धिविनायक गणपती मंदिराचे अध्यक्ष ड. मंगेश पोकळे सर यांच्या मार्गदर्शनाने व ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे जेष्ठ कीर्तनकार यांच्या संयोजनाने गणपती मंदिरामध्ये प्रत्येक एकादशी व चतुर्थीला अखिल भारतीय गायत्री परिवाराकडून यज्ञाचे आयोजन करण्यात येते. याबरोबरच यशवंत नगर मधील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर येथे धार्मिक ग्रंथ वाचन, भजन, हरिपाठ हे नित्यनेमाने चालत असलेले सांप्रदायिक कार्य अविरत सुरू आहे. याबरोबरच दिनांक ८/१०/२५ पासून अश्विन वद्य प्रतिपदेपासून सांप्रदायिक काकडा आरंभ झाला या पवित्र मासामध्ये मंदिरामध्ये दररोज सकाळी पाच ते सात या वेळेमध्ये काकडा भजन सुरू झाले आहे . या काकडा भजनासाठी यशवंत नगर व परिसरातील गायक, वादक तसेच भजनी मंडळ आणि महिला भजनी मंडळ-सौ. जोशी, सौ.मेहेत्रे,सौ.यादव,सौ. जाधव,सौ.परदेशी यांची उपस्थिती असते . काकड आरती नंतर श्री सिद्धिविनायक गणेशाची नित्य पूजा व आरती होऊन महाप्रसाद वाटप करण्यात येतो. या काकडा भजनासाठी भाविक भक्त सक्रिय सहभाग नोंदवतात. यामध्ये मुकुंद भुतपल्ले ,मोहन महाराज खरमाटे,ह.भ.प. गोकुळ महाराज तुपे शाश्री.ह.भ.प. परदेशी भाऊ,विठ्ठलराव भराटे,मेहेत्रे, यादव, महावीर शेठ, बोरा ,वाल्मीक चाटे, तुकाराम पंत जोशी, काका, जाधव साहेब वालचंद चाटे ,मेढे साहेब पांडुरंग खोशे महाराज ,साईनाथ दुधाळ आदी परिश्रम घेतात.

### राज्यशास्त्र विभागातर्फे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यास पुस्तके वाटप



**नेकनूर । प्रतिनिधी**

प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयामध्ये राज्यशास्त्र विभाग अंतर्गत एमपीएससी यूपीएससी तसेच स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थिनीस पुस्तक वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी.के. यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक इनकर व्ही.एस. यांच्याकडून होतकरू विद्यार्थ्यांना त्यांच्या यशापर्यंत जाण्यासाठी प्रेरणा मिळावी तसेच त्यांना स्पर्धा परीक्षेच्या अभ्यास करण्यासाठी राज्यशास्त्र विभागातर्फे सहकार्य म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी.के. यांच्या हस्ते पुस्तक भेट देण्यात आली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### राजर्षी शाहू कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींचा इशारा

**शाळेच्या प्रांगणात असलेली डी.पी. इतरत्र न बसविल्यास रस्ता रोको आंदोलन**



**बीड । प्रतिनिधी**

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ बीड संचलित, राजर्षी शाहू कन्या प्राथमिक/माध्यमिक विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल, तेलगाव रोड, बीड येथे प्री-प्रायमरी ते इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत ८५० मुली शिक्षण घेत आहेत. शाळेच्या मैदानावर मुली नियमितपणे खेळतात, परंतु मैदाना लगत असलेल्या वीज ▶ उर्वरित पान २ वर

# आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नाने 100 रुग्णांना 82 लाखांची मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत

**'रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा' आ.धस यांच्या माध्यमातून अमर वाळके यांची उल्लेखनीय कामगिरी**

**आष्टी । प्रतिनिधी**



दु:खात असलेल्या माणसाला आधार देणं, हेच खरं देवपूजेचं काम आहे, या भावनेला साकार करत मराठवाडा भूषण, लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नाने आणि प्रेरणेने 'रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा' या ग्रुपने गेल्या एका वर्षात समाजात एक आदर्श निर्माण केला असून या कालावधीत या ग्रुपच्या माध्यमातून १०० रुग्णांना तब्बल ₹८२ लाखांची आर्थिक मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व विविध शासकीय योजनांमधून मिळवून देण्यात आली. ही मदत फक्त आर्थिक नव्हे, तर प्रत्येक रुग्णाच्या जीवनात पुन्हा आशेचा किरण निर्माण करणारा आ.सुरेश धस यांचा संवेदनशील प्रयत्न ठरला आहे. रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा' ग्रुपचे कार्यकर्ते रुग्णसेवक अमर वाळके हे रुग्णांच्या उपचारासाठी लागणारी कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया, शासकीय ▶ उर्वरित पान २ वर

**रुग्ण सेवक अमर वाळके म्हणाले,गेल्या वर्षभरात आमच्या ग्रुपने १०० रुग्णांना मदतीचा हात दिला आणि शासन योजनांमधून ८२ लाखांची थेट आर्थिक मदत मिळवून दिली. या सेवाभावी प्रवासात मला थोडं का होईना आ.सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली योगदान देता आलं, ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. या उपक्रमामुळे आष्टी मतदारसंघात सामाजिक बांधिलकीची परंपरा अविरत चालू आहे.गरजू रुग्णांना नवसंजीवनी देण्याचं काम 'रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा' ग्रुप सातत्याने करत आहे.**

## छाया पांचाळ मृत्यू प्रकरणी विभागीय आरोग्य कार्यालयात किस्किंदा पांचाळ यांची धाव

**मा. श्रीधर पाठक, मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक विभागीय आरोग्य कार्यालय लातूर यांना किस्किंदा पांचाळ यांचे निवेदन ; आठ दिवसांत कारवाई न झाल्यास उपसंचालक कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा**

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा रुणालयात प्रसुतीदरम्यान मृत्यूमुखी पडलेल्या छाया गणेश पांचाळ (वय २५, रा. आंबिलवडगाव, ता. जि. बीड) यांच्या मृत्यू प्रकरणात मुख्य दोषींवर कारवाई न करता केवळ मावशीवर अन्यायकारक निलंबन करण्यात आल्याचा आरोप किस्किंदा पांचाळ यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी मा. श्रीधर पाठक, मुख्य प्रशासकीय



अधिकारी, उपसंचालक विभागीय आरोग्य कार्यालय लातूर यांना आज लेखी निवेदन सादर केले. उपसंचालक परिमंडळ कार्यालय लातूर येथील मा. श्रीधर पाठक यांनी या प्रकरणी चौकशी समितीकडून अहवाल अद्याप प्राप्त झालेला नसल्याचे स्पष्ट केले असून, आतापर्यंत अहवाल यायला हवा होता; मात्र समितीने तो सादर केलेला नाही, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, किस्किंदा पांचाळ यांनी आठ दिवसांच्या आत कारवाई न झाल्यास लातूर येथील उपसंचालक कार्यालया समोर ▶ उर्वरित पान २ वर

## संभाजीनगर येथील हंबरडा मोर्चासाठी बीड जिल्ह्यातील शेतकरी व शिवसैनिक यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे: शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या उपस्थितीत व शिवसेना नेते विधान परिषद विरोधी पक्ष नेते अंबादास दादा दानवे साहेब यांच्या नियोजनाखाली छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ शनिवार रोजी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये शासनाने मदत द्यावी शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी,ओला दुष्काळ जाहीर करावा,आशा विविध मागण्या संदर्भात भव्य असा हंबरडा मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे सदरील मोर्चा



मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या मागण्या व न्याय हक्कासाठी स्वत: शिवसेना पक्षप्रमुख सन्माननीय उध्दवजी ठाकरे साहेब यांच्या नेतृत्वाखालील या मोर्चामध्ये जास्तीत जास्त शिवसैनिक व शेतकरी बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## महाराष्ट्र राज्यामध्ये निर्बंधित असलेला गुटखा बेकायदेशीरपणे विक्री केल्या प्रकरणी आरोपीस जामीन मंजूर : ॲड. श्रीराज शेळके

**बीड । प्रतिनिधी**

सविस्तर फिर्याद अशी कि, बीड शहर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये पोलीस पेट्रोलिंग करत असताना बडीराज गल्ली येथे अजहर किराणा दुकानात पान मसाला, सुगंधित तंबाखू व महाराष्ट्र राज्यामध्ये निर्बंधित असलेला गुटखा बेकायदेशीरपणे बॉक्स मध्ये विक्री करत असताना दिनांक २८ सप्टेंबर रोजी छापा मारला असता सुगंधी



तंबाखू,पान मसाला व गुटखा ज्याची किंमत ८५००/ रुपयेचा व एक पे रिक्षा असा सदरील गुन्ह्यात जप्त करण्यात आला व गुन्हा क्र १९०/२०२५ नुसार कलम १२३, २२३,२७४, २७५, ३(५) भारतीय न्याय संहिता व कलम ५९ अन्न सुरक्षा व मानके अधिनियम प्रमाणे बीड शहर पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदवण्यात आला. सदरचा माल कोठून आणला असे आरोपीस विचारले असता शहादेव दळवी हा त्याचे ▶ उर्वरित पान २ वर

## बारा बलुतेदार महासंघाच्यावतीने शिवरत्न जिवाजी महाले यांना अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचे अंगरक्षक शिवरत्न जिवाजी महाले यांची जयंती बारा बलुतेदार महासंघाच्यावतीने उत्साहात साजरी करण्यात आली. बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणण परिसरात असलेल्या शिवरत्न ▶ उर्वरित पान २ वर



# 'श्री मंगलनाथ मल्टीस्टेट'चे संस्थापक अध्यक्ष मा. आर. जी. कानडे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

**मा.श्री राधाकृष्ण विखे पाटील जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान**

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सहकारी फेडरेशन व नॅशनल फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट च्या संयुक्त विद्यमाने आशिया अखंडातील सर्वात मोठी असलेलेली बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्रातील




पतसंस्था चळवळीचे मार्गदर्शक, आधारस्तंभ, मा.राधेशामजी चांडक हे ७५ व्या वर्षात पदार्पण करत असल्याबद्दल अमृत महोत्सव सोहळा कार्यक्रम सहकार मंदिर बुलढाणा येथे आयोजित करण्यात आला होता. सदरील अमृत सोहळा कार्यक्रमांमध्ये माजलगावचे भूषण,सहकार रत्न, श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे संस्थापक अध्यक्ष श्री.आर.जी कानडे साहेब यांना मा. नामदार राधाकृष्ण विखे पाटील जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ▶ उर्वरित पान २ वर

## उत्कृष्ट दर्जाची तूरदाळ खरेदीसाठी दरपत्रके मागविण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयास सार्वजनिक धान्य वितरण प्रणालीअंतर्गत वितरणासाठी उत्कृष्ट दर्जाची अंदाजे ११५ क्विंटल तूरदाळ खरेदी करणेस मान्यता देण्यांत आली आहे. त्यामुळे अधिकृत ठोक धान्य पुरवठादार व्यक्ती/संस्था यांचेकडून दरपत्रके मागविण्यांत येत आहेत. मा. महाराष्ट्र शासनाकडून निधी उपलब्धतेनुसार नमूद देयकाची रक्कम पात्र पुरवठादारांना या कार्यालयाकडून प्रदान करण्यांत येईल. इच्छुक पुरवठादारांनी या कार्यालयाच्या मागणीनुसार उत्कृष्ट दर्जाची तुरदाळ ०३ किलो च्या पाकीटांमध्ये बीड जिल्ह्यातील शहरी/ग्रामिण भागातील १६ धान्य गोदामाचे ठिकाणी आवश्यकतेनुसार पोहोच करणेसाठीचा वाहतूक खर्च, हमाली, भराई, वाराई व थप्पी लावणे तसेच जीएसटी व अन्य कर व दरांसह सर्व अनुषंगिक खर्चाचा समावेश करुन प्रतिकिलो दर सिलबंद लिफाफ्यात दि.१३.१०.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत सादर करावेत असे जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

